मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » शुक्रवार, दि. 1 नोव्हेंबर 2024 | पान- 1


# भोसरीतील विरोधकांची अवस्था म्हणजे 'दिवा विझतानाची फडफड'!

## शिवसेनेच्या निर्धार मेळाव्यात शिवसैनिकांची सडकून टीका : महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघांमध्ये विरोधकांची अवस्था अगदी केविलवाणी झाली आहे. त्यांच्याकडे बोलण्यासारखे काही विषय राहिलेले नाहीत. त्यामुळे ते बेसुर झाले आहेत. सत्ताधारी आमदारांवर आरोप करण्यासाठी कोणताही विषय ठोस नाही. म्हणून बॅनर लावून टीका करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. "दिवा विझताना जशी फडफड होते" अगदी तशीच विरोधकांची अवस्था झाली असल्याची टीका शिवसेनेच्या निर्धार मेळाव्यात शिवसैनिकांकडून करण्यात आली.

पिंपरी-चिंचवड शिवसेनेच्या वतीने महायुती तर्फे भाजपचे भोसरी विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपजिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, उपनेते इरफान सय्यद, संभाजी शिरसाठ, मनीषा फुंदे, उपजिल्हाप्रमुख अरुण जोगदंड, संदीप क्षीरसागर ,सागर पाचारणे, रोहित जगताप , दत्ता आवराळे , संदीप जाधव, जान्हवी पवार आदी उपस्थित होते.

या निर्धार मेळाव्यात बोलताना उपजिल्हाप्रमुख भगवान पोखरकर म्हणाले की, कामाच्या माध्यमातून आमदार महेश लांडगे यांनी मतदारसंघाला एका सूत्रात बांधले आहे. मतदारांना विकासाच्या बाबतीत आपले भलेबूरे चांगलेच कळते. विरोधकांच्या खोट्या गप्पांना मतदान भुलणार नाहीत.





उपनेते इरफान सय्यद म्हणाले विरोधकांना दहा वर्षानंतर आरोप करायचे शहाणपण सुचले आहे. विरोधाला विरोध हे एकच सूत्र विरोधकांचे आहे. पण, मतदार सुज्ञ आहेत. आपल्या हाकेला धावणारे नेतृत्व कोणते हे मतदारांना आता चांगलेच कळते. गेली वीस वर्ष अनेक सुविधांसाठी आपण प्रतीक्षेत होतो. त्या सुविधा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यामुळे गेल्या दहा वर्षात आपल्याला उपलब्ध झाल्या. यामध्ये न्यायालय संकुल, इंजीनियरिंग कॉलेज, संतपीठ, नामांकित शैक्षणिक संस्था अशी अनेक उदाहरणे देता येतील. अनेक शासकीय योजना आपले सरकार राबवत आहे. त्या शासकीय योजना मतदारसंघातील माता-भगिनी युवक यांच्यापर्यंत कशा पोहोचतील याचा देखील पाठपुरावा लांडगे यांच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे झाला आहे.

संदीप शिरसाठ म्हणाले की, विरोधकांचे आरोप म्हणजे दिवा विझताना होणारी फडफड आहे. विरोधकांना जेव्हा बोलण्यासारखे काही नसते त्यावेळी खोटे आरोप केले जातात. हे भोसरी मतदारसंघांमध्ये पहिल्यानंतर स्पष्ट जाणवते. 2004 मध्ये मी रोजगारासाठी या शहरात आलो होतो. त्यानंतर उत्तरोत्तर मी प्रगती केली. मला कुठेही या मतदारसंघात दडपशाही जाणवली नाही. माझ्यासारख्या बाहेरून आलेल्या माणसाला जर या विधानसभा मतदारसंघांमध्ये सुरक्षित वाटत असेल तर जे येथील स्थानिक आहे त्यांनाच कुठून दडपशाही दिसून येते, मला हेच कळत नाही. 288 मतदारसंघ महाराष्ट्र राज्यात आहेत. त्यापैकी एकमेव भोसरी मतदारसंघ असेल जिथे विरोधकांना खोट्या आरोपांचे बॅनर लावून प्रचार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे स्पष्ट जाणवते की विरोधकांची अवस्था अगदी केविलवाणी झालेली आहे.

### गडी रांगडा पण मनानं हळवा..!

» शिवसेनेच्या निर्धार मेळाव्यामध्ये उपनेते इरफान सय्यद म्हणाले "गडी पैलवान ,दिसायला रांगडा" असे आमदार महेश लांडगे यांचे व्यक्तिमत्व आहे. पण आमदार मनानं अगदी हळवे आहेत. स्वच्छ चारित्र्याचे आहेत. महिला सक्षमीकरण आणि त्यांची सुरक्षा असा अजेंडा घेऊन ते काम करत आहे. त्यामुळे शहरातील माता भगिनी आपला पाठीराखा म्हणून त्यांच्याकडे पाहतात.हिंदुत्वाचा झेंडा हाती घेऊन त्यांनी एका विचाराने आपली वाटचाल सुरू केली. म्हणून आम्ही शिवसैनिक त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत..शिवसैनिक विचाराने पक्के असतात.एकदा आदेश आला की ते मागेपुढे पाहत नाहीत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य प्रगतीपथावर जात आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आपल्या विचारांचे सरकार आणण्यासाठी आम्ही महेश लांडगे यांच्या पाठीशी उभे राहून एकजुटीने काम करणार आहोत.

" राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सर्वसामान्यतील असामान्य नेतृत्व आहे. त्यांच्या माध्यमातून शिवसैनिक चांगल्या प्रकारे काम करत आहे. या शिवसैनिकांच्या सोबतीने भोसरी मतदारसंघांमध्ये अधिकाधिक चांगल्या प्रकारच्या योजना भविष्यामध्ये आपल्याला आणायच्या आहेत. मतदारसंघ विकासाच्या दृष्टीने एका उंचीवर नेऊन ठेवायचा आहे. शाश्वत विकासाचे स्वप्न आपण नक्कीच सोबतीने पूर्ण करू. .

**- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# मतदान प्रक्रिया सुलभपणे पार पडण्यासाठी मतदान केंद्रावर सोयी सुविधा उपलब्ध करून देणार : आयुक्त शेखर सिंह

## येत्या 20 नोव्हेंबर रोजी राज्यासह शहरातील पिंपरी, भोसरी आणि चिंचवड विधानसभा मतदार संघामध्ये मतदान प्रक्रिया पार पडणार आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

मतदानाच्या दिवशी मतदारांना सहज व सुलभपणे मतदान करता यावे, तसेच त्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी शहरातील सर्व मतदान केंद्रावर महापालिकेच्या वतीने विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने येत्या २० नोव्हेंबर रोजी राज्यासह शहरातील पिंपरी, भोसरी आणि चिंचवड विधानसभा मतदार संघामध्ये मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्याअनुषंगाने शहरातील तिन्ही मतदार संघातील



विविध मतदान केंद्रांची पाहणी आयुक्त शेखर सिंह यांनी केली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले, देवन्ना गट्टूवार, उपआयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त मुकेश कोळप, अजिंक्य येळे कार्यकारी अभियंता नितीन निंबाळकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

मतदानाच्या दिवशी नागरिकांना मतदान करण्यात कोणतीही अडचण येऊ नये, मतदानाची प्रक्रिया सुलभ व सहजपणे पार पडावी तसेच शहरातील मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी महापालिका विविध उपक्रम राबवीत आहे. त्यानुषंगाने शहरातील सर्व मतदान केंद्रावर महापालिकेच्या वतीने आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये मतदानासाठी रांगेत उभे असलेल्या मतदारांसाठी बसण्याची व्यवस्था करण्यात येणार असून त्यासाठी मतदान केंद्रांवर खुर्च्या व बेंच याची व्यवस्था करण्यात येणार आहे. मतदारांसाठी पिण्याचे स्वच्छ पाणी, रांगेत उभे असलेल्या मतदारांसाठी जागेवर पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येणार आहे. तसेच सर्व शाळा व मतदार केंद्रांवरील शौचालये वेळोवेळी स्वच्छ करण्याच्या सूचना देखील आयुक्त सिंह यांनी दिल्या. शहरातील सर्वच मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिकांसाठी आणि दिव्यांगांसाठी व्हीलचेअर, आवश्यक ठिकाणी रॅम्पची सोय करण्यात येणार आहे. वाहनांना पार्किंगची सोय, मतदारांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी मंडप उभारणी, दिशा दर्शक फलक लावणे अशा सर्व सोयी सुविधा मतदान केंद्रांवर मतदानाच्या दिवशी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्याबाबतचे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

मतदारांना आपले मतदान केंद्र व मतदार यादीतील नाव याबाबत माहिती देण्यासाठी महापालिकेच्या वतीने सर्व क्षेत्रीय कार्यालयाच्या ठिकाणी नो यूवर पोलींग स्टेशन हे कक्ष उभारण्यात आले असून त्यासाठी सारथी हेल्पलाईन वर कॉल करण्याचे आवाहन ही महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पूरस्थितीच्या कारणांचा अहवाल आला पण आयुक्तांनी कार्यवाही केली नाही

## सजग नागरिक मंचचा आरोप, अहवाल सादर होत नसल्यावरून पुणेकरांनी संताप व्यक्त केला होता.

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग केल्यानंतर सिंहगड रस्ता परिसरासह शहरात पूरस्थिती निर्माण झाली होती. पूरस्थितीचे कारण शोधण्यासाठी पुणे महापालिकेने समिती नेमली होती. या समितीचा अहवाल सादर होत नसल्यावरून पुणेकरांनी संताप व्यक्त केला होता. अखेर हा अहवाल सादर करण्यात आला आहे, पण त्यावर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी कोणतीच कार्यवाही केली नसल्याचा गंभीर आरोप सजग नागरिक मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी केला आहे.

घाटमाथ्यावर पावसाने दमदार हजेरी लावल्याने खडकवासला धरणक्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा साठा वाढल्याने धरणातून विसर्ग सोडण्यात आला होता. धरणातून पाणी सोडल्यानंतर सिंहगड रस्ता परिसरासह इतर भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. त्याचा नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. प्रत्येक वेळी धरणातून पाणी सोडल्यानंतर अशीच परिस्थिती निर्माण होणार का, असा प्रश्न पुणेकरांकडून उपस्थित केला जात होता. त्यामुळे पुण्यात पूरपरिस्थिती झाल्यानंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. पूरपरिस्थितीची वेगवेगळी कारणे सांगण्यात आली. त्यामुळे महापालिका प्रशासन गोंधळले होते. त्यावर उपाययोजना करण्यासाठी चांगलीच कसरत करावी लागली.

पूरपरिस्थिती निर्माण होण्यामागे मूळ कारण नेमके काय, हे शोधण्यासाठी बांधकाम, ड्रेनेज आणि पथ विभागाकडून प्रत्येकी एक सदस्य असे मिळून तीन सदस्यीय समिती नेमण्यात आली होती. परंतु समितीकडून अहवाल सादर केला जात नव्हता. त्यामुळे अहवाल का सादर केला जात नाही, यावरून चांगलेच वातावरण तापले होते. समितीने सादर केलेला अहवाल जनतेसाठी खुला करण्याची मागणी सजग नागरिक मंचने केली होती. त्यानुसार अहवालावर चर्चा केल्यानंतर तो जनतेसाठी खुला केला जाईल, असे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी आधी सांगितले होते. परंतु नंतर त्यांनी यू टर्न घेत 'ही धोरणात्मक चौकशी समिती नव्हती,' असे सांगत अहवाल जाहीर केला जाणार नाही, हे स्पष्ट केले. आयुक्तांनी घेतलेल्या भूमिकेवर सजग नागरिक मंचसह पुणेकरांनी निषेध केला होता. तसेच आयुक्त हे सनदी नोकर आहेत, महापालिकेचे मालक नाहीत, असे सांगत अहवाल जाहीर करण्याची पुन्हा एकदा मागणी केली होती.



### महापालिका आयुक्त गंभीर नाहीत...

» आयुक्त कार्यालयात हा अहवाल पाहणीसाठी मागितला होता. या संदर्भातील आयुक्तांचेच आदेश त्यांच्या निदर्शनास आणून दिले. मग नाईलाजाने आयुक्तांनी त्या अहवालाचे दोन खंड वाचण्यास दिले, मात्र त्यातून एक स्पष्ट झाले की या अहवालावर अजूनपर्यंत आयुक्तांनी काहीही केलेले नाही. पुण्याच्या पूरस्थितीवर उपाययोजना करण्याचा विषय आयुक्त गांभीर्याने घेत नाहीत," असा आरोप वेलणकर यांनी केला.

### आचारसंहितेचे दिले होते कारण

» महापालिका आयुक्तांच्या निर्देशाप्रमाणे अवलोकन केलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यासाठीचे शुल्क भरून घेऊन त्वरित देणे आवश्यक आहे, हे निदर्शनास आणण्यात आले होते. या अहवालाच्या प्रतीची मागणी करण्यात आली होती. आठवडाभर पाठपुरावा केल्यानंतर आयुक्त कार्यालयाने आचारसंहितेचे कारण दाखवून अहवालाची प्रत देण्यास नकार दिला. मुळात आचारसंहितेच्या आधीच्या अहवालाचा आचारसंहितेशी संबंध काय? आचारसंहितेच्या नावाखाली हा अहवाल जनतेपासून दडवण्याचे उद्योग सुरू आहेत. कारण या अहवालात प्रशासनाच्या अनेक त्रुटी दाखवल्या गेल्या असल्याचे तो अहवाल वाचताना लक्षात आले. तसेच पूररेषांची नव्याने आखणी करण्याची गरज आणि पूररेषेतील तसेच नदीपात्रातील अतिक्रमणांबाबत यात उल्लेख आहेत. हा अहवाल जनतेसमोर येणे हा जनतेचा हक्क आहे. त्याचा निवडणूक किंवा आचारसंहितेशी काहीही संबंध नाही, असे वेलणकर यांचे म्हणणे आहे.

> “ समितीने आपला अहवाल सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात सादर केला. तो सहा आठवडे होऊन गेले तरी अजून प्रसिद्ध केला नाही. हा अहवाल आणि त्यावर आयुक्तांनी सुरू केलेली उपाययोजना, याची माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी, अशी मागणी आम्ही केली होती. त्याला आयुक्तांनी नकार दिला होता. आता अहवाल आला आहे, पण काहीच कारवाई केली नाही..
>
> - विवेक वेलणकर, अध्यक्ष, सजग नागरिक मंच.

---

# पीएमपीएमएलच्या साडेअकरा हजार बस फेल

## ठेकेदारांच्या बससंदर्भातील तक्रारींची संख्या तुलनेने अधिक

**पुणे | प्रतिनिधी**

सणासुदीच्या काळामध्ये सार्वजनिक वाहतूक सेवा बजावणारी पीएमपी सेवेला ब्रेकडाऊनचे ग्रहण लागली आहे. विविध कारणांनी रस्त्यावरती पीएमपी बस बंद पडत असल्याच्या घटना घडतात. गेल्या सहा महिन्यांत पीएमपीएमएलच्या ११ हजार ७५७ बस रस्त्यावर बंद पडल्याची (ब्रेकडाउन) नोंद आहे. यात सर्वाधिक म्हणजे २,७१३ बसेस एकट्या ऑगस्ट महिन्यात रस्त्यावर बंद पडल्या. बंद पडणाऱ्या बसमध्ये ठेकेदारांच्या बसची संख्या अधिक असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते.

या आठवड्यात दिवाळी असल्याने विविध ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढते. त्यातच पाडवा आणि भाऊबीज या दिवशी पीएमपी बस वाढवण्यात येतात. मात्र, महामंडळातील अनेक आगारातील बस या किलोमीटरच्या मर्यादा ओलांडलेल्या आहेत. परिणामी, या बस रस्त्यातच बंद पडल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीएच्या हद्दीत पीएमपीचे एकूण ३८१ मार्ग आहेत. या मार्गावर साधारण १,६०० च्या आसपास बस दररोज धावतात. यापैकी साधारण साडेआठशे बस ठेकेदारांच्या, तर साडेसातशे बस पीएमपीच्या आहेत. त्यात सर्वाधिक बस ठेकेदारांच्या बंद पडत असल्याचे पीएमपीचे अधिकारी सांगत आहेत.



ठेकेदाराने पीएमपीसोबत करार करताना ठरल्याप्रमाणे बस मार्गावर सोडणे बंधनकारक असते. ठेकेदारांकडून या बस मार्गावर सोडल्याही जातात. पण, ठेकेदारांच्या बसचे दररोज ब्रेकडाउन होते. त्यामुळे मार्गावरील बसची संख्या घटते. त्याचा थेट फटका प्रवाशांना बसत असून, त्यांना रस्त्यातच उतरवण्यात येते. त्यामुळे या दिवाळीच्या तोंडावरती शहरातील प्रवाशांना हा फटका बसू नये, यासाठी पीएमपी प्रशासनाने काळजी घेणे आवश्यक आहे.

---


# मतदारांना नव्या स्वरूपातील ओळखपत्र

## जिल्ह्यातील 7 लाख 60 हजार 559 मतदारांना असे कार्ड वाटप करण्यात आले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्या कृष्णधवल (ब्लॅक-व्हाइट) मतदार ओळखपत्राऐवजी स्मार्ट कार्ड स्वरुपात निवडणूक ओळखपत्र अर्थात "इपिक' कार्ड देण्याचा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतला. गेल्या दहा महिन्यांत पुणे जिल्ह्यातील ७ लाख ६० हजार ५५९ मतदारांना असे कार्ड वाटप करण्यात आले आहेत.

मतदारांनी आठ क्रमाकांचा अर्ज भरल्यानंतर त्यांना घरपोच केंद्रीय निवडणूक आयोगाकडून स्मार्ट कार्ड स्वरुपातील "इपिक' कार्ड दिले जाते. त्यामुळे मतदारांची ओळखही आता स्मार्ट बनली आहे. "इपिक' कार्ड म्हणजे "इलेक्टर्स फोटो आयडंटिफिकेशन कार्ड' आहे.



तर, या कार्डवर "इपिक' नंबर म्हणजेच मतदार ओळख क्रमांक दिलेला असतो."इपिक' कार्डच्या वाटपाबाबत आम्ही पोस्ट विभागाला स्वतंत्र सूचना दिल्या आहेत. त्याशिवाय संबंधित मतदारांपर्यंत निवडणुकीपूर्वीच इपिक कार्ड द्या. ज्या मतदारापर्यंत इपिक कार्ड पोहोचणार नाही त्यांना मोबाइलद्वारे संपर्क करून त्यांच्यापर्यंत इपिक कार्ड पोहोचविण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत, असे निवडणूक शाखेकडून सांगण्यात आले.

तर, १९ हजार ८४७ इतके इपिक कार्ड संबंधित मतदार त्या ठिकाणी राहत नसल्याने किंवा घर बंद असल्याचे कारण सांगून पोस्टामार्फत परत आले आहेत किंवा पत्ता सापडत नसल्याचे कारण सांगण्यात आले आहे. दरम्यान, ४६ हजार ७२६ इतके इपिक कार्ड नव्याने प्रिंटिंगसाठी पाठविले आहेत, अशी माहिती जिल्हा निवडणूक शाखेकडून देण्यात आली.

# पिंपरीतील 1122 जणांचे पिस्तूल पोलिसांकडे जमा

## जमा केलेली पिस्तुले निवडणूक निकाल लागल्यानंतर म्हणजेच 23 नोव्हेंबरनंतर 7 दिवसांनी परत केली जाणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परवानाधारक पिस्तूल जवळ बाळगून फिरण्यास, सार्वजनिक ठिकाणी ते नेण्यास जिल्हा प्रशासनाने मनाई केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील ११२२ परवानाधारकांनी आतापर्यंत आपल्याकडील पिस्तूल पोलिसांकडे जमा केली आहेत. जमा केलेली पिस्तुले निवडणूक निकाल लागल्यानंतर म्हणजेच २३ नोव्हेंबरनंतर सात दिवसांनी परत केली जाणार आहेत.



राज्यात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान आहे. ही निवडणूक प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी निवडणूक विभागाबरोबरच जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनानेही कंबर कसली आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत पिंपरी, चिंचवड, भोसरी, खेड, मावळ, भोर-वेल्हा-मुळशी, वडगावशेरी, खडकवासला या विधानसभा मतदारसंघांचा भाग समाविष्ट होतो. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे आवश्यक असल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम प्राप्त अधिकारान्वये निवडणूक कालावधीत परवानाधारक पिस्तूल जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निवडणूक काळात शस्त्र बाळगणे तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे कृत्य करण्यास मनाई करण्यात आली आहे.

आर्थिक व वैयक्तिक सुरक्षेच्या कारणास्तव, ग्रामीण भागात शेतातील पिकांचे संरक्षण, रानटी जनावरांपासून संरक्षण मिळविण्यासाठी पिस्तूल, रिव्हॉल्वर आणि दुबार बंदुकीचे परवाने जिल्हाधिकाऱ्यांकडून दिले जातात. गृह विभागाने लागू केलेल्या सर्व अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या व्यक्तीला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शस्त्र परवाना दिला जातो. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत एकूण १८०० पिस्तूल परवानाधारक आहेत. त्यापैकी ११२२ जणांनी आपली पिस्तुले पोलिसांकडे जमा केली आहेत. संबंधित पोलीस ठाण्याने पिस्तूल परवानाधारकाला पिस्तूल जमा करण्याबाबत नोटीस बजावल्यास सात दिवसांच्या आत पिस्तूल जमा करणे बंधनकारक असते. शहरासह ग्रामीण भागात गुन्हेगारीचे प्रमाण मोठे आहे. आतापर्यंत अनेक गुन्ह्यांत गावठी कट्टे, पिस्तूल अशा शस्त्रांचा वापर झाला आहे. निवडणूक काळात या गुन्ह्यांचे प्रमाण आणखी वाढते. याच पार्श्वभूमीवर ही शस्त्रे जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

ज्या परवानाधारकावर गंभीर गुन्हा दाखल आहे, गंभीर गुन्ह्यातून ज्यांची नुकतीच जामिनावर सुटका झालेली आहे किंवा ज्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशा व्यक्तींना संबंधित पोलीस ठाण्यात पिस्तूल जमा करावी लागणार आहेत. उर्वरित पिस्तूलधारकांना निवडणूक काळात पिस्तूल जवळ बाळगण्यास, सार्वजनिक ठिकाणी पिस्तूल नेण्यास प्रशासनाने मनाई केलेली आहे. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर सात दिवसांनंतर ही पिस्तुले परत केली जाणार आहेत.

### 'तरच पिस्तूल बाळगता येणार'

» निवडणूक काळात सरसकट सर्वांचेच पिस्तूल जमा करून घेता येणार नाहीत, असे उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. एखाद्या राजकीय व्यक्तीला खरोखरच पिस्तूल जवळ बाळगणे गरजेचे असेल, तर तसा अर्ज त्याने देणे आवश्यक असते. त्यानंतर संबंधित समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर राजकीय व्यक्तीला पिस्तूल बाळगण्याची परवानगी द्यायची किंवा नाही याबाबत निर्णय घेतला जातो. आयुक्तालयाच्या हद्दीत १८०० परवानाधारक पिस्तूल आहेत. यापैकी ३६६ जणांना सवलत देण्यात आली आहे. इतरांना पिस्तूल जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार, आतापर्यंत ११२२ जणांनी पिस्तूल जमा केले आहेत. उर्वरित व्यक्तींकडून पिस्तूल जमा करून घेतले जात आहेत, असे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील विशेष शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी सांगितले.

# निगडी, आकुर्डीतील मेट्रो स्टेशन कामाला गती

## वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी नेमले खासगी वॉर्डन : अडीच वर्षांत काम पूर्ण होणार?

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी ते निगडी या प्रस्तावित मेट्रोच्या कामाला गती वाढली आहे. येत्या अडीच वर्षांमध्ये हे काम पूर्ण करण्याचा मानस महा मेट्रो प्रशासनाने व्यक्त केला आहे. सध्या निगडी आणि आकुर्डी येथील मेट्रो स्थानकांच्या फाऊंडेशनचे काम पूर्ण करण्यात आले आहे. पुढच्या टप्प्यात चिंचवड येथील स्थानकाच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. दरम्यान, कामामुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडी समस्या निर्माण होत आहे. त्यासाठी ४० खासगी वॉर्डन नेमण्यात आली आहे. त्याचप्रमाणे स्थानिक वाहतूक पोलिसांची देखील समन्वय साधून काम सुरू आहे.



स्वारगेट ते पिंपरी- चिंचवड महापालिका हा मार्ग पुढे निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत वाढवावा, अशी नागरिकांकडून सातत्याने मागणी केली जात होती. या विस्तारित मार्गाला केंद्रीय गृहनिर्माण व नागरी कामकाज मंत्रालयाने २३ ऑक्टोबर २०२३ रोजी मान्यता दिली होती. त्यानंतर पुणे मेट्रो प्रशासनाने १६ डिसेंबर रोजी बांधकामाची निविदा प्रसिद्ध केली होती. त्यानुसार या कामाला आता सुरुवात झाली होती. भक्ती-शक्ती चौक आणि पवळे ब्रीज येथे बॅरिकेटिंग करण्यात आले आहे.

सुरुवातीला माती परीक्षणाचे कामकाज सुरू करण्यात आले. या मार्गावर चिंचवड, आकुर्डी, निगडी प्राधिकरण आणि भक्ती-शक्ती चौक या स्थानकांचा समावेश असणार आहे. या कामांना गती मिळाली आहे. निगडी येथील भकृती-शकृती चौक आणि आकुर्डी येथील मेट्रो स्थानकाचे काम झाले आहे. या दोन्ही ठिकाणचे फाऊंडेशनचे कामकाज पूर्ण करण्यात आले आहे. आता चिंचवड येथील स्थानकाच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. यासह सध्या निगडीपर्यंत पिलर उभारण्याच्या कामाला देखील सुरुवात करण्यात आली आहे. या कामांसाठी दोन्ही बाजूला बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. वाहतुकीला अडथळे येऊ नयेत, यासाठी वाहतूक शाखेला नियोजन करण्याबाबत कळवण्यात आले असल्याचे मेट्रो प्रशासनाने सांगितले. अडीच वर्षांत हे काम पूर्ण करण्याचे उद्देश असल्याचे मेट्रो प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. त्याचप्रमाणे खडकी हे स्थानक येत्या काही दिवसांमध्ये पूर्ण होऊन कार्यान्वित होईल, अशी माहिती देखील मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी दिली. नोव्हेंबर अखेरपर्यंत हे स्थानक सुरू होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यानंतर खडकी परिसरातील नागरिकांना देखील मेट्रोचा वापर करता येणार आहे. फुगेवाडी आणि कासारवाडी या दोन ठिकाणी प्रवासी संख्या तुलनेने कमी आहे. ती वाढवण्याबाबत मेट्रोकडून नियोजन देखील आखण्यात आले आहे.

> निगडी आणि आकुर्डी येथील मेट्रो स्थानकाची फाऊंडेशनपर्यंतची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. अडीच वर्षात काम पूर्ण करण्याचा मेट्रो प्रशासनाचा उद्देश आहे. पिलरचे देखील काम सुरू आहे. कामाला गती आहे.
>
> - हेमंत सोनवणे, जनसंपर्क अधिकारी, महामेट्रो.

# थायलंडमध्ये प्रति 'दगडूशेठ' गणपती मंदिर

## थायलंडमधील फुकेतमध्ये 'लॉर्ड श्रीमंत गणपती बाप्पा देवालय' लवकरच खुले

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे जगभरात भाविक आहेत. अनेकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरातील 'श्रीं'चे दर्शन घेण्यासाठी जगभरातून भाविक येतात. थायलंडमधील फुकेत येथे आता हुबेहुब श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर साकारण्यात आले आहे. फुकेतमधील मंदिरात विधीवत 'श्रीं' ची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने हुबेहुब साकारलेल्या मूर्तीची बुधवारी लाल महाल ते श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिरात झालेल्या कार्यक्रमास ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, राजाभाऊ चव्हाण राजूशेठ सांकला, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, मंगेश सूर्यवंशी, सचिन आखाडे यांसह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. मूर्तीचे विधिवत पूजन करण्यासाठी फुकेत ९ रियल इस्टेट कंपनी लिमिटेडच्या अध्यक्ष, उद्योजिका पापा सॉन मिपा आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. उद्योजिका पापा सॉन मिपा यांनी स्वखर्चातून फुकेतमध्ये मंदिर साकारले आहे. त्यासाठी ट्रस्टचे प्रशासकीय अधिकारी चेतन लोढा यांनी समन्वय साधून विशेष सहकार्य केले.

दगडूशेठ गणपतीच्या दर्शनाने आम्हाला उर्जा मिळते. फुकेतमध्ये मंदिर उभारणे हे अशक्यप्राय वाटत होते. मात्र, दगडूशेठ गणपती ट्रस्टच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले आहे. याचा आम्हाला विशेष आनंद आहे. थायलंडच्या पंतप्रधानांनी फुकेतमध्ये बांधण्यात आलेल्या मंदिराची पाहणी केली, असे पापा सॉन मिपा यांनी नमूद केले.

थायलंडमध्ये ५० फूट उंच मंदिर साकारण्यात आले आहे. हे गणपती मंदिर 'लॉर्ड श्रीमंत गणपती बाप्पा देवालय' या नावाने रवाई बीच फुकेतमध्ये साकारण्यात येणार आहे. दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन आता थायलंडसह परिसरातील भाविकांना घेता येईल. दगडूशेठ गणपतीच्या मुख्य मूर्ती सोबत पंचधातूची छोटी मूर्ती, त्याचबरोबर सिद्धी माता, बुद्धी माता, श्री लक्ष, श्री लाभ या मूर्तींची देखील तेथील मंदिरात कायमस्वरूपी प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. तसेच पुण्यातील मंदिरात जसे शंकराचे मंदिर आहे तसेच फुकेत येथील मंदिरात देखील असणार आहे. दगडूशेठ गणपती मंदिरातील मूर्तीप्रमाणे हुबेहूब मूर्ती पुण्यात साकारण्यात आली. मूर्ती साकारण्यासाठी एक वर्ष २० दिवस कालावधी लागला आहे. थायलंडमधून अनेक भाविक पुण्यात येतात. आता भाविकांना तेथे दर्शन घेता येणार आहे. थायलंडमधील मंदिरासाठी नऊ कोटी रुपये खर्च आतापर्यंत झाला आहे, असे ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी सांगितले.

### दीड वर्षात मंदिराचे काम पूर्ण

**» थायलंडमधीलमंदिराचे भूमीपूजन जुलै २०२३ रोजी करण्यात आले. दीड वर्षातमंदिराचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. त्यांनी तेथील मूर्तीमध्ये सुद्धा गणेश यंत्र विधीवत पूजन करून बसवले आहे. फुकेतमध्ये प्राणप्रतिष्ठाना करून लवकरच मंदिर थायलंडमधील भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे. 'श्री'च्या मूतीसाठी दागिने देखील करण्यात आले आहेत.**

# पुणे जिल्ह्यातील फटाके स्टॉल अनधिकृत

## पीएमआरडीएकडून एकालाही परवानगी नाही : साडेआठशे गावांमधून एकही अर्ज दाखल नाही

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए) जिल्ह्यातील जवळपास साडेआठशे गावांची हद्द आहे. दिवाळीच्या तोंडावर पिंपरी-चिंचवडप्रमाणेच ग्रामीण भागातील विविध ठिकाणी फटाक्यांचे स्टॉल उभारले आहेत. त्यासाठी शहरातील अग्निशामक विभागाकडे रीतसर अर्ज दाखल करावे लागतात. मात्र, ग्रामीण भागातील या फटाक्यांच्या स्टॉलसंदर्भात एकही अर्ज पीएमआरडीएच्या विभागाकडे आलेला नाही. तर, या विभागांनीही अद्याप कोणाला परवानगी दिली नाही. परिणामी, जिल्ह्यातील साडेआठशे गावात उभारलेले फटाके स्टॉल नेमके कोणाच्या संमतीने उभारण्यात आले आहेत, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडलेला आहे.



पुणे, पिंपरी-चिंचवड या दोन्ही शहरांमध्ये स्थानिक पातळीवर अग्निशमन विभाग परवानगी देते. त्यामुळे अनुचित प्रकार घडल्यास संबंधित फटाका स्टॉलची माहिती अग्निशामक विभागाकडे असते. मात्र त्याला फाटा देत शहरातील विविध भागात फटाका स्टॉल उभारल्याचे दिसून येतात. त्यातच आता ग्रामीण भागात देखील या स्टॉलचे मोठ्या प्रमाणात पेव सुटले आहे. त्यात हिंजवडी, मारुंजी, चाकण, मावळ, मुळशी, भोर या यासारख्या महत्त्वाच्या आणि मोठ्या लोकवस्तीमध्ये फटाका स्टॉल उभारण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे या गावातील स्थानिक पातळीवरती परवानगी मिळाली तरी, अग्निशमन विभागाचे 'ना हरकत' प्रमाणपत्र आवश्यक असते. मात्र, जिल्ह्यातील ग्रामीण भागात एकानेही अशी परवानगी घेतल्याचे नसल्याचे उघडकीस आलेले आहे. याबाबत अग्निशमन दल विभागाकडून माहिती घेतल्यास असे निदर्शनास आले की, जाचक अटी, कागदपत्रांची पूर्तता आणि अधिकृत फटाका स्टॉलसाठी नियम आहेत. पर्यायाने त्याने नियमाची पूर्तता संबंधित व्यवसायाकडून होत नसल्याने ते परवानगी घेण्यासाठी येतच नाहीत. अनेकदा आवाहन करूनही याबाबत कागदपत्रे सादर न केल्याने परवानगी देता येत नाही, असे सांगितले. तसेच विविध भागातून नागरिक परवानगीसाठी विचारतात मात्र, त्यानंतर ते पुन्हा येत नसल्याचे अग्निशामक विभागातील सूत्रांनी सांगितले.

> पिंपरी-चिंचवड, पुणे शहरांमध्ये फटाका स्टॉल उभारण्यासाठी तेथील अग्निशमन दल परवानगी देते. मात्र, पीएमआरडीएने तशी परवानगी दिलेली नाही. विक्रेत्यांना आवाहन करूनही ते येत नाहीत.
> - देवेंद्र पोटफोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी, पीएमआरडीए.

### अग्निशमन दलात मनुष्यबळाची कमतरता

**» फटाक्यामुळे शहरात विविध ठिकाणी आगीच्या घटना घडत असतात. ग्रामीण भागातही अलीकडे फटाक्यांचा वापर वाढला आहे. त्यामुळे आगीची घटना घडल्यास अग्निशमन दलाला तिथपर्यंत पोहोचण्यामध्ये वेळ लागतो. त्यातच मनुष्यबळाची कमतरता असल्याने एकाच वेळी आगीचा कॉल आल्यास मोठ्या प्रमाणात धावपळ होते. त्यामुळे यंदाची दिवाळी अग्निशमन दलापुढे मोठे आव्हान असणार आहे.**